
# ३ सामाजिक सुधारक

✦ प्रास्ताविक ✦ लहुजी साळवे ✦ विठ्ठल रामजी शिंदे ✦ संत गाडगे महाराज ✦ अण्णाभाऊ साठे

## (अ) लहुजी साळवे

इतिहास विषयाचा अभ्यास करताना, इतिहासाचा सर्वांगाने मागोवा घेताना एक बाब निदर्शनास येते, ती म्हणजे इतिहासरूपी घटनांच्या साखळीतील, मालिकेतील एक-एक दुवा निखळलेला आहे. म्हणजेच परंपरागत चालत आलेल्या इतिहासलेखन पद्धतीनुसार राजा, त्याचे सरदार, जहागीरदार, वतनदार, राजाचा राजपरिवार, त्याने केलेल्या लढाया यांनाच इतिहासात अग्रक्रम देण्याची मानसिकता अगदी अर्वाचीन काळापर्यंत चालू राहिलेली दिसते. त्यातूनच कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसणाऱ्या, ज्ञानार्जनाशी दुरान्वयानेही संबंध नसणाऱ्या मात्र समाजाच्या प्रगतीच्या वाटचालीत आपले मौलिक योगदान देणाऱ्या अनेक सर्वसामान्य व्यक्तींचे कार्य, महत्त्वपूर्ण घटना या काळाच्या पडद्याआडच राहिल्या. कारण इतिहासात कोणाला अग्रपूजेचे स्थान, दर्जा द्यायचा आणि कोणत्या व्यक्ती, संस्था, विचार आणि प्रसंग किंवा घटना यांना विस्मृतीत ढकलायचे या निवडीचे सर्वस्वी अधिकार हे समाजातील उच्चवर्णीय, प्रभुत्वशाली गटांकडे होते. त्यातून उपरोक्त दोष संभवतो. असाच काहीसा प्रकार ज्यांनी आपले सर्व आयुष्य इतरांसाठी, समाजासाठी खर्ची घातले त्यांच्याही वाट्याला आला. या दीर्घकालीन परंपरेमधीलच एक असलेले नाव म्हणजे लहुजी साळवे होय. ज्या लहुजी साळवे यांनी सामाजिक बदलासाठी, कनिष्ठ व वरिष्ठांमध्ये समतेच्या प्रस्थापनेसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले, त्यांच्याही कार्यावर आवश्यक तेवढा प्रकाश टाकला गेलेला नाही. अशाच अज्ञात, अलिखित व्यक्तींच्या कार्याची, त्यांच्या चारित्र्याची, आचार-विचारांची नि नीतिमूल्यांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी यासाठी आपण येथे समाजसुधारक लहुजी साळवे यांचा जीवनपरिचय व त्यांचे कार्य याचा आढावा घेणार आहोत.

Scanned with CamScanner



लहुजी साळवे

## पूर्वपरिचय

लहुजी साळवे यांच्या कार्यकर्तृत्वाचा मागोवा घेत असताना त्यांच्या साळवे घराण्याची पार्श्वभूमी पाहणे आवश्यक ठरते. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या एतद्देशीयांच्या स्वराज्याशी एकनिष्ठ असलेल्या अनेक घराण्यांपैकी हे एक घराणे होते. या घराण्यातील सर्वच व्यक्तींनी आपल्या निष्ठा स्वराज्याप्रति, छत्रपतीचरणी वाहिलेल्या दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडापासून ते पेशवाईपर्यंत त्यामध्ये तसूभरही फरक पडल्याचे आढळत नाही. स्वराज्याच्या वृद्धीसाठी आपण ज्यांच्या पदरी सेवा बजावत आहोत त्यांच्याशी या घराण्याने कधीही बेईमानी केली नाही. आपला राजा, आपले स्वराज्य यावर आलेल्या कोणत्याही संकटाचे निवारण करण्यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे सदैव तत्परता दाखवली. या घराण्यातील व्यक्तींमध्ये असलेल्या स्वराज्यनिष्ठेमुळे, इमानदारपणामुळे आणि झुंजारवृत्तीमुळे शिवाजी महाराजांनी आपल्या जहागिरीमध्ये पुण्यानजीक असलेल्या पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी या घराण्याकडे सोपविली होती. कारण अत्यंत घनदाट अरण्याने वेढलेला, हिंस्र, पशूंचा वावर असलेल्या किल्ल्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळू शकण्याची क्षमता या घराण्याकडे आहे असा शिवछत्रपतींचा विश्वास होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या घराण्यावर दाखवलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता तो सार्थ ठरविला.

पुरंदर किल्ल्याच्या उतरणीवर एक छोटेसे गाव होते. किल्ल्यावर वास्तव्याला असलेल्या लोकांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता करणाऱ्या वस्तूंची या ठिकाणी खरेदी-विक्री होत होती. हेच गाव पुढे 'पेठ' या नावानेच प्रसिद्ध पावले. याच छोट्याशा गावातील अत्यंत पराक्रमी घराणे म्हणजेच साळवे घराणे होय. पूर्वापार परंपरेने चालत आलेल्या शस्त्रविद्येत निष्णात असलेले हे घराणे होते. दांडपट्टा, कट्यार, तलवार, खंजिर, भाला, वाघनखे इत्यादी शस्त्रास्त्रे अत्यंत सफाईदारपणे चालवण्यात हे घराणे माहीर होते. सर्वदूर त्यांचा बोलबाला होता. इतर घराण्यातील चालीरीतीप्रमाणे या घराण्यातसुद्धा होऊन गेलेल्या पूर्वजांची नावे नातू किंवा पणतूला देण्याचा रिवाज होता. उदा. लहुजी साळवे यांच्या पणजोबांचे नावसुद्धा लहुजी असेच होते. त्यांच्या ठायी असलेल्या शौर्यामुळे, विविध गुणांमुळे शिवाजी

महाराजांनी त्यांना 'राऊत' अशी पदवी देऊन त्यांच्यावर पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपविली. पुढे या घराण्यातील अनेकांनी किल्ल्याच्या रक्षणापायी आपल्या प्राणाचे आत्मसमर्पण केले. बलदंड देहयष्टी आणि कमावलेल्या ताकदीचा त्यांनी स्वराज्याकामी सुयोग्य वापर केला. जेजुरीचा खंडोबा हे साळवे घराण्याचे कुलदैवत होते. घोड्यावरून जेजुरीला जाऊन खंडोबाचे दर्शन घेण्याची प्रथा या घराण्यातील लोकांनी अव्याहतपणे सांभाळली होती. अशा या पराक्रमी साळवे घराण्यात लहुजींचा जन्म झाला.

## जन्म व बालपण

शौर्य आणि पराक्रमांचा खूप मोठा वारसा लाभलेल्या साळवे घराण्यामध्ये १४ नोव्हेंबर, १७९४ रोजी लहुजी साळवे यांचा जन्म झाला. विठाबाई हे त्यांच्या आईचे नाव तर राघोजी साळवे हे त्यांचे वडील. वडील राघोजी साळवे यांनी आपले आजोबा लहुजी यांचेच नाव आपल्या मुलाला दिले. लहुजींच्या बालपणी घरातील शस्त्रे हीच त्यांची खेळणी बनल्याने बालमनावर शस्त्रविद्येचे संस्कार कोरले गेले. बालपणापासूनच लहुजींना धष्टपुष्ट शरीरयष्टी लाभलेली होती. त्यातच लहानपणापासूनच शस्त्रांशी झालेला संग, पुरंदरसारख्या किल्ल्याच्या परिसरात गेलेले बालपण यामुळे कोणत्याही कारणाने घाबरणे किंवा भित्रेपणा कधी त्यांच्या मनालाही शिवला नाही.

वडील राघोजींकडून लहुजींना बालपणापासूनच शस्त्रविद्या व मल्लविद्येचे बाळकडू मिळाले. वडिलांच्या सोबत घोड्यावर बसून पुरंदर परिसरात रपेट मारणे, निशाणेबाजी, तलवारबाजी, दांडपट्टा यांसारख्या विद्यांतही ते निपुण झाले. पोहणे, घोड्यावर बसून डोंगर चढणे हे त्यांचे छंद होते. आकर्षक शरीरयष्टी, मजबूत बांधा आणि जोडीला नाना प्रकारच्या विद्या यामुळे वयाच्या सोळाव्या वर्षीच पेशवे दरबारात ते नाकेदार म्हणून रुजू झाले. तत्पूर्वीच राघोजी साळवे यांच्या पराक्रमाची वार्ता दुसऱ्या बाजीरावास कळताच त्यांनी राघोजीची शिकारखान्याच्या प्रमुखपदी नेमणूक केली. तेव्हापासून साळवे कुटुंब पुरंदर सोडून पुणे प्रांती जनाईचा मळा याठिकाणी वास्तव्य करू लागले. राघोजी साळवेंचा मोठा मुलगा शिवाजी हादेखील पेशव्यांच्या दरबारी नोकरीस होता. राघोजी आणि शिवाजी या दोघांनीही पेशवे दरबारी अत्यंत प्रामाणिकपणे सेवा केली. आसपासच्या परिस्थितीची जाण झालेल्या लहुजींचे मात्र नोकरीत मन रमत नव्हते. कारण पेशवे काळात अस्पृश्यतेच्या समस्येने जी हद्द ओलांडली होती त्यामुळे त्यांचे मन बेचैन झाले

Scanned with CamScanner

होते. सर्वसामान्य प्रजाही पेशवाईवरती रुष्ट होती. सर्वत्र अवहेलना, असमानता, अगतिकता पसरलेली होती. त्यातच दुसऱ्या बाजीरावाच्या जुलमी, अन्यायी, अत्याचारी व अकार्यक्षम कारभाराला जनता पुरती कंटाळलेली होती. अस्पृश्यांवर लादलेल्या विविध निर्बंधांमुळे त्यांचे जीवन पशुतुल्य बनलेले होते. विविध बंधनांनी त्यांना जीवन नकोसे झाले होते. अस्पृश्यांच्या ज्ञानार्जनावर लादलेली बंदी, गावकोसाबाहेर वास्तव्य करण्याची पदरी आलेली अवहेलना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर लादलेले अनेक निर्बंध यामुळे हा समाज हवालदिल, हतबल झालेला होता. उपरोक्त अनन्वित अत्याचाराने लहुजींचे अंतर्मन पोखरले जात होते. आपल्यासमोर आपल्या समाजबांधवांवर होत असलेले अन्याय-अत्याचार त्यांच्याकडून पाहवले जात नव्हते. यातूनच त्यांच्या मनात समाजपरिवर्तनाचे विचार रुंजी घालू लागले.

## खडकीचे युद्ध

याच दरम्यान पेशवे आणि होळकर यांच्यात निर्माण झालेल्या वितुष्टातून होळकरांनी पुण्यावर आक्रमण केले. त्यात पेशव्यांचा पराभव झाला. पेशवा दुसरा बाजीराव याने सारासार विचार न करता १८०२ मध्ये इंग्रजांशी तह करून त्यांच्या साहाय्याने पेशवेपदाची पुनःप्राप्ती केली मात्र सर्वाधिकार इंग्रजांच्या हाती राहिले. पेशवा केवळ नामधारी प्रमुख उरला. इंग्रजांच्या जाळ्यात अडकलेला पेशवा इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, स्वतःची सुटका करून घेण्यासाठी गुप्तपणे इंग्रजांशी दोन हात करण्याच्या तयारीला लागला. या वेळी पेशव्यांच्या सैन्याचे नेतृत्व बापू गोखले करत होते. लढाईसाठी शस्त्रास्त्रांची नितांत आवश्यकता होती. पेशवे शस्त्रागारात पुष्कळ शस्त्रास्त्रे धूळ खात पडलेली होती. त्यास परजले तर युद्धकामी येतील यास्तव त्यांची दुरुस्ती होणे अगत्याचे होते. हे काम चोखपणे पार पाडण्यासाठी सर्वांच्या समोर एक नाव आले ते म्हणजे राघोजी साळवे. त्यांनी मोठ्या कष्टाने, रात्रीचा दिवस करून हे काम पूर्ण केले. या कामात राघोजींना लहुजींचे विशेष साहाय्य लाभले. शस्त्रे परजून तयार झाली मात्र चालवणारे सैनिक अपुरे पडू लागले. म्हणून राघोजींनी पुरंदर परिसरातून मातंग, रामोशी, भिल्ल, कोळी आदी जातीतील सैनिकांची जमवाजमव केली. याच सैन्यात लहुजी साळवेसुद्धा सैनिक म्हणून सहभागी होते. अगोदरच लहुजींना परक्या इंग्रजांविषयी खूप राग होता. इंग्रजांचा बदला घेण्याची हीच योग्य वेळ आहे असे मनाशी पक्के ठरवून इंग्रजांना या देशातून बाहेर काढल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही अशी

Scanned with CamScanner

लहुजींनी जणू प्रतिज्ञाच केली होती. ५ नोव्हेंबर, १८१७ रोजी खडकी युद्धाला सुरुवात झाली. मराठी सैन्य आपल्या पराक्रमाची शर्थ करत होते. मात्र इंग्रजांच्या अत्याधुनिक शस्त्रांपुढे व प्रशिक्षित सैन्यापुढे त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. वडील राघोजींबरोबर लहुजीही निकराने इंग्रजांशी लढा देत होते. मात्र अचानकपणे बापू गोखलेंच्या घोड्याला गोळी लागली. परिणामी त्यांनी युद्धातून माघार घेतली. त्याच वेळी इंग्रजांच्या एका गोळीने राघोजी साळवेंचा वेध घेतला नि ते गतप्राण झाले. स्वतःच्या डोळ्यादेखत वडिलांच्या झालेल्या मृत्यूमुळे लहुजींवरती दुःखाचा डोंगर कोसळला. खडकीच्या युद्धात मराठी सैन्याचा पराभव झाला. दुसऱ्या बाजीरावाने पुण्याहून पलायन केले. इंग्रजांनी पुण्यावर वर्चस्व निर्माण केले. मराठ्यांचा भगवा ध्वज उतरवून शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकू लागला. या दारुण, भयावह वास्तवाने लहुजींची तळपायाची आग मस्तकापर्यंत पोहोचली. त्याचसमयी लहुजींनी प्रतिज्ञा केली की, 'मी ही इंग्रजी राजवट उलथवून टाकल्याशिवाय गप्प बसणार नाही.' तेव्हापासून त्यांनी स्वतःला स्वातंत्र्यकार्यासाठी झोकून दिले. खडकीच्या लढाईत जेथे राघोजी मरण पावले, शहीद झाले तेथेच आज मांगीरबाबा नावाचे छोटेसे मंदिर आहे. ते म्हणजेच राघोजी साळवेची समाधी होय.

## लहुजी साळवेंचे कार्य

खडकीच्या लढाईनंतर मराठी प्रांतात इंग्रजांचा कारभार सुरू झाला. पूर्वी मातंग, रामोशी गस्त घालत, पहारा देत. मात्र आता त्या जागी इंग्रज पोलीस गस्त घालू लागले. त्यामुळे अनेकांचे उपजीविकेचे साधन हिसकावले गेले. बेकार झालेले अनेक जण लहुजींकडे आपल्या व्यथा मांडू लागले. तेव्हा लहुजींनी या सर्वांना आवाहन केले की, जर यातून मार्ग काढायचा असेल तर इंग्रजांना नेस्तनाबूत करून पुन्हा आपले स्वराज्य निर्माण करावे लागेल. त्यासाठी इंग्रजांना शह देण्यासाठी एकेकट्याने नव्हे तर संघटित प्रतिकार केला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे लहुजींचे प्रेरणास्रोत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे मावळ खोऱ्यातील सर्व जातीधर्मांतील लोकांना एकत्र करून बलाढ्य इस्लामी सत्तांशी संघर्ष केला, त्याच निर्धाराने लहुजींनी उपेक्षित समाजातील तरुणांना संघटित करून दांडपट्टा, तलवारबाजी, भालाफेक, नेमबाजी, बंदूक चालवणे यांसारखे लष्करी शिक्षण देऊ लागले. स्वतः लहुजी तरुणांना कुस्तीच्या डावपेचाचे धडे देऊ लागले. यास्तव ते लहुजी वस्ताद या नावाने सर्वपरिचित झाले.

Scanned with CamScanner

भारतमातेच्या मुक्ततेसाठी तत्पर असलेल्या तरुणांना विनामोबदला शस्त्रपारंगत करण्याचा उद्योग आरंभिला व सर्वांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात सहभागी होण्यास प्रेरित केले. लहूजी साळवे तरुणांना शस्त्रविद्या, मल्लविद्या याचे धडे देण्याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप यांच्या रोमांचक शौर्यकथांचा पट उलगडून प्रेरित करीत. त्यांचा हा आखाडा म्हणजे जणू क्रांतिशाळाच होती. तरुणांमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण करून स्वराज्यप्राप्तीसाठी त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. केवळ मातृभूमीच्याच विचाराने ते भारावलेले होते. संवेदनशील मनाच्या लहुजींना आपल्या अस्पृश्य बांधवांवर सवर्णांकडून होणाऱ्या अन्यायाची आत्यंतिक चीड होती. घोटभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागणाऱ्या आपल्या बांधवांसाठी विहीर खोदून सर्वांसाठी खुली केली. लहुजींचे हे कार्य म्हणजे एक सामाजिक क्रांतीच होती. लहुजी साळवेंच्या विचारांचा वसा घेतलेल्या त्यांच्या असंख्य शिष्यांनी आपापल्या परीने मातृभूमीची सेवा केली. समाजात ऐक्य, समता निर्माण होण्यास हातभार लावला. लहुजी साळवे आणि क्रांतिवीर उमाजी नाईक यांचेही फार जिव्हाळ्याचे संबंध होते. उमाजी नाईकांचे आत्मबलिदान भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याचे ज्योत तेवत ठेवून गेले. उमाजींना दिलेल्या फाशीमुळे लहुजींचे मन फार दुःखी झाले. उमाजीबद्दलच्या भावना व्यक्त करताना लहुजी साळवे म्हणतात, "माझा उमाजी हा नरवीर होता. डोंगराचा राजा होता. आद्य क्रांतिवीर ठरला. इंग्रजांशी लढता-लढता, हसत-हसत फासावर गेला. आम्ही त्याचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही." उमाजींच्या कार्यापासून स्फूर्ती घेऊन लहुजींनी आपले क्रांतिकार्य पुन्हा जोमाने सुरू केले. लहुजी साळवेंच्या विचारपीठाचा वारसा पुढे महात्मा जोतिबा फुले यांनी प्रभावीपणे चालवला. सामाजिक उत्थानासाठी त्यांनी शिक्षणक्षेत्रात अत्यंत क्रांतिकारी कार्य केले. शिक्षण हेच बहुजनांच्या आत्मोन्नतीचे प्रभावी साधन आहे याची जाण असलेल्या महात्मा फुलेंसमवेत स्वतः लहुजी साळवेदेखील अस्पृश्यांच्या वस्तीवस्तीत जाऊन मुला-मुलींच्या शिक्षणाचा आग्रह त्यांच्या पालकांकडे धरायचे. मुलींच्या शिक्षणाला पाठबळ मिळावे यासाठी लहुजींनी आपले बंधू शिवाजीची मुलगी मुक्ता साळवे हिला जोतिबांनी स्थापन केलेल्या शाळेत दाखल कले. हीच मुक्ता साळवे महात्मा फुलेंच्या शाळेतील पहिली अस्पृश्य विद्यार्थिनी होय. चौदा वर्षे वयाच्या मुक्ता साळवे हिने लिहिलेल्या अस्पृश्यांच्या दुःखाविषयीच्या निबंधात जातीयता, धर्मांधता यावर व्यक्त केलेल्या परखड मतांमुळे संपूर्ण समाजमन ढवळून निघाले.

Scanned with CamScanner

आयुष्याच्या उतारवयातही लहुजी इंग्रजांना भारतातून बाहेर घालवण्यासाठी कार्यरत राहिले. पुणे परिसरातून स्वातंत्र्यप्राप्तीच्या कार्यात सशस्त्र क्रांतीस पाठबळ मिळत असल्याचा सुगावा इंग्रजांना लागताच त्यांच्या नजरा लहुजींकडे वळल्या. याचा सुगावा लागताच लहुजींनी आपले कार्य सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात अविरतपणे सुरूच ठेवले. भारतमातेची इंग्रजांच्या जोखडातून मुक्तता करणे हीच त्यांची इच्छा होती. १८५७ नंतर परिस्थितीचे फासे उलटे फिरले. भारतात इंग्रजांची सत्ता अधिकाधिक दृढच होत गेली. त्यामुळे लहुजी अधिकच उद्विग्न, अस्वस्थ झाले आणि केवळ स्वातंत्र्याच्या विचाराने भटकंती करीत राहिले. अशाच अवस्थेत १७ फेब्रुवारी, १८८१ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ८६ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या लहुजी साळवेंनी निःस्वार्थी भावनेतून देशसेवेसाठी आपले सर्वस्व पणाला लावले. लहुजींच्या पश्चात सुमारे साठ-पासष्ट वर्षांनी या देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली. ज्या घराण्यातील व्यक्ती स्वराज्याशी एकनिष्ठ राहिल्या, ज्यांनी आपल्या अलौकिक पराक्रमाने इतिहासाच्या पानोपानी सुवर्णाक्षरे कोरली जावीत असे कर्तृत्व केले त्या लहुजी साळवेंचे कार्यही स्वातंत्र्यानंतर काळाच्या पडद्याआडच राहिले. आज आधुनिक युगात भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या समाजाला अशा व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या कार्याची ओळख व्हावी, त्यापासून प्रेरणा मिळावी आणि भावी पिढीत नैतिक नीतिमूल्यांची जोपासना व्हावी या उद्देशाने या ठिकाणी त्यांच्या जीवनकार्याचा घेतलेला आढावा निश्चितच उद्‌बोधक ठरेल असा आशावाद वाटतो.

Scanned with CamScanner

A) विठ्ठल रामजी शिंदे. (1873-1944)

प्रस्तावना

-महाराष्ट्रातील समाजसुधारण्याच्या इतिहासात अस्पृश्यता निवारण करणाऱ्या सुधारकांमध्ये कर्मवीर वीठ्ठल रामजी शिंदे अग्रस्थानी होते. मानवी मूल्यांची जोपासणा करण्यासाठी दिर्घकाळ प्रयत्न करणारे त्यागाचे प्रतीक म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांना ओळखले जाते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांचा त्यांनी प्रसार केला. अनिष्ट धार्मिक परंपरा नष्ट करण्यासाठी जीवन समर्पित करणारे ते एक कर्मयोगी होते. एक समाजसुधारक विभीन्न धर्मातील तत्वांचे संशोधक, विद्वान म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांना ओळखले जाते.

जीवनवृत्तांत

-कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म कर्नाटक मधील जमखिंडी याठीकाणी 1873 मध्ये झाला. यमुनाबाई व रामजी हे त्यांचे आई-वडिल होय. त्यांचे घराणे सुखवस्तू जागीरदार होते. प्रत्येक्षात मात्र कुडुंबाची आर्थिक स्थिती बेतात्चीच होती. कुडुंबातील धार्मिक वातावरणामुळे त्यांचा स्वभावदेखील सहनशील, सहिष्णु, समभाव असा निर्माण झालेला होता. सन 1891 मध्ये मॅट्रीकची परिक्षा पास झाल्यानंतर गावातील हायस्कुलमध्ये शिक्षकाची नोकरी स्विकारली होती. या कालावधीत जमखिंडीच्या सरकारांनी पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर केली होती. पुढील शिक्षणासा-ठी पुणे शहरात प्रवेश घेतल्यानंतर असंख्य अडचणींना सामोरे जात मराठा एज्युकेशन सोसायटी आणि बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यामदतीमुळेच फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी B.A. ची पदवी संपादन केली.

विठ्ठल रामजी शिंदे यांना अनेक ज्ञानी व अनुभवी लोकांचा सहवास लाभला. ते प्रार्थना समाजाचे सभासद झाले. विविध धार्मिक ग्रंथाचा सखोल अभ्यास केला. 'कार्ल मार्क्स'

Scanned with CamScanner

आगरकर, रानडे, भंडारकर यांच्या लेखनाचा त्यांच्यावरती विशेष प्रभाव पडला होता. या कालावधीत अमेरिकेतील युनिटेरियन संस्थेच्यावतीने भारतातील एकेश्वर पंथाच्या तरुणास परदेशी शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली होती. प्रार्थना समाजाच्या सहाय्याने कर्मवीर १९०१ मध्ये इंग्लंडला गेले. तेथील २ वर्षांच्या कालावधीत जगातील अनेक धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला. आंतरराष्ट्रीय उदारधर्म परिषदेमध्ये त्यांनी हिंदुस्थानातील उदारधर्म हा प्रबंध वाचला. भारतात आल्यानंतर प्रार्थना व ब्राम्हो समाजाच्या कार्याबरोबरच अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. अशा समाजसेवकाचे निधन १९४४ मध्ये झाले.

१) प्रार्थना समाजासाठी केलेले कार्य.

—[उच्च शिक्षण घेऊन मायदेशी आल्यानंतर विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाच्या प्रचारासाठी कार्य केले. प्रार्थना व ब्राम्हो समाजाच्या प्रसारासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. आपल्या समाजाला रुढी, प्रथा, परंपरा यामधून मुक्त करण्यासाठी संपूर्ण देशाचा प्रवास करून जनजागृती केली.] जगातील सर्व उदार व सहिष्णू धर्म सुधारक चळवळींची माहिती सांगणारा इतिहास 'थीईस्टिक डीस्कव्हरी' हा ग्रंथ लिहीला. तरुणांचे वर्ग, व्याख्याने, उपदेश, लेख यामाध्यमातून धर्मप्रचार केला. सातारा जिल्ह्यात प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून विशेष कार्य केले आहेत. केवळ धर्मप्रचारकाची भूमीका नबजावता मानवता धर्माची समतावादी प्रचाराची भूमिका त्यांनी पार पाडली. सन १९१० नंतर ब्राम्हो समाजाच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले.

२) अस्पृश्य उद्धाराचे कार्य

— अस्पृश्य लोकांच्या समस्याकडे मानवतावादी दृष्टीकोनातून प्रत्यक्ष कृती करणारे समाजसुधारक म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते. त्यांचे हे काम पुढे नेण्याचे कार्य कर्मवीर शिंदे यांनी केले आहे. प्रार्थना व ब्राम्हो समाजाचा प्रचार करत असताना संपूर्ण अस्पृश्य समाजाची दयनीय अवस्था त्यांच्या दृष्टीस पडली होती. या स्थितीमध्ये परिवर्तन करण्यासाठी अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य त्यांनी

हाती घेतले. 1905 मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील भिंगार याठिकाणी भरलेल्या अस्पृश्यांच्या सभेला ते उपस्थीत राहिले. याठिकाणीच त्यांनी अस्पृश्यांचा उध्दार करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निश्चय केला. यातूनच 'अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी 18 ऑक्टोबर 1906 रोजी मुंबई याठिकाणी डिप्रेस्ड क्लासेस मिशन (निराश्रीत साहाय्यक कार्यकारी मंडळी) ही संस्था स्थापन केली.

डिप्रेस्ड क्लासेस मिशन

— अस्पृश्य समाजाची अनेक प्रश्नामधून सुटका करण्यासाठी गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी श्री विठ्ठल रामजी शिंदे यांनी यासंस्थेची स्थापना केली. (18 ऑक्टोबर 1906) या संस्थेची महत्त्वपूर्ण उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे :

1) अस्पृश्य समाजात शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे. त्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे.
2) अस्पृश्य लोकांसाठी शाळा, उद्योगशाळा, दवाखाने, वसतिगृह इत्यादींची निर्मीती करणे.
3) ~~अस्पृश्य~~ स्पृश्य समाजात परिवर्तन घडून आणणे. अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरामधून पाठिंबा मिळविणे.
4) अस्पृश्यांना नोकरी मिळवून देणे.
5) अस्पृश्य लोकांना सार्वजनिक धर्माची शिकवण देणे.
6) अस्पृश्यांच्या सामाजिक प्रश्नांचे निराकरण करणे.

या संस्थेने वरील उद्दीष्ट्ये पूर्ण करण्यासाठी परिश्रम पुर्वक प्रयत्न केले. अनेक ठिकाणी शाळा, दवाखाने, वसतिगृह निर्माण करण्यात आली. व्याख्याने, कीर्तन यामधून सामाजिक प्रबोधन घडून आणले. पुणे, मुंबई, सातारा, ठाणे, मद्रास, अमरावती इत्यादी व अनेक ठिकाणी या संस्थेच्या शाखा पाडण्यात आल्या. 1917 च्या राष्ट्रीय सभेच्या आधीवेशनात कर्मवीरांच्या प्रयत्नामुळेच अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजूर करण्यात आला. 1933 मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक लिहीले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच अस्पृश्यांच्या उध्दाराचा कार्यक्रम संपूर्ण भारतभर विस्तारीत झाला.

Scanned with CamScanner

3) शेतकरी परिषदा

— विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत अत्यंत सखोल विचार करून कार्य केलेले आहेत. ब्रिटीश राजवटीत शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली होती. ब्रिटीशांच्या दुर्लक्षाचा परिणाम सावकार व सरकारी नोकर यांच्या कडून शेतकऱ्यांचे शोषण केले जात होते. दारिद्र्य व अज्ञान यामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांचे प्रमाण वाढीस लागले होते. अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांना संघटीत करून जागृत करण्याचे कार्य विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. सन 1928 मध्ये पुणे याठिकाणी शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. करवाढ व तुकडेबंदी या सरकारी निर्णयामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार होते. याविरोधात त्यांनी यशस्वी नेतृत्व केले. मुंबई, बोरगाव, तेरदळ, चांदवड याठिकाणी शेतकऱ्यांच्या परिषदा आयोजीत करून शेतकऱ्यांमध्ये आपल्या हक्काची व एकजुटीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले.

4) साहित्य व संशोधनाचे कार्य

— विठ्ठल रामजी शिंदे यांनी सखोल निरीक्षण, अध्ययन दूरदृष्टी यांच्या आधारावरती उत्कृष्ठ ग्रंथाची निर्मिती केली आहे. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत संशोधनपर लिखाण केले आहे ते पुढीलप्रमाणे :

A) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न (ग्रंथ आहे – पाहिला)

— या ग्रंथामध्ये त्याकाळातील अस्पृश्यांच्या बाबतीत समाजाच्या दृष्टीकोणाविषयी विश्लेषण केले आहे. अस्पृश्यतेच्या प्रश्नांचा त्यांनी मुलगामी विचार याग्रंथामध्ये विशद केला आहे.

B) माझ्या आठवणी व अनुभव

— विठ्ठल रामजी शिंदे यांचे माझ्या आठवणी व अनुभव हे आत्मचरित्र आहे. अहंकाराचा स्पर्श नसलेले आत्मचरित्र याठिकाणी निदर्शनास येते. त्यांची भावशैली, सामाजिक विषयांची मांडणी, लिखाणातील कोवळेपणा इत्यादी वैशिष्ट्ये दिसून येतात.

C) शिंदे लेखनसंग्रह

— ग. ल. ठोकळ यांनी शिंदे लेखनसंग्रह हा ग्रंथ

Scanned with CamScanner

Date 31/1/14

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लेखांचा संग्रह म्हणून प्रकाशित केला आहे. अध्यात्मिक, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास संशोधन सामाजिक सुधारणा इत्यादीविषयी त्यांनी केलेले लिखाण या ग्रंथाच्या माध्यमातून प्रकाशीत केलेले आहेत.

5) इतर सुधारणा

– प्रार्थना व ब्राम्हो समाजाचा प्रचार व अस्पृश्य आणि शेतकऱ्यांच्या उद्धाराचे कार्य, दर्जेदार ग्रंथाची निर्मिती याबरोबरच इतर सामाजिक कार्यातही विठ्ठल रामजी शिंदे सहभागी झालेले होते. महात्मा गांधी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत ते सक्रिय सहभागी झालेले होते. मद्यपान, देवदासींची पद्धत, शिमग्याच्या सणातील अनिष्ट प्रकार याला प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भाषणे, चर्चासत्र, खेळाचे सामने आयोजित करून संस्कृती संवर्धनाचे कार्य केले. मानवी समाजाच्या सर्वांगीण प्रगती साठी पोषक ठरणाऱ्या सामाजिक सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केला.

सारांश –

सामाजिक सुधारणेच्या त्यांच्या कार्यावर सनातनवादी लोकांनी टिका केली. तरीही अस्पृश्यता निर्मूलन, धर्मसुधारणा, अध्यात्मनिष्ठा व राष्ट्रीय स्वातंत्र्य यासाठी आग्रही राहून उपेक्षीत, वंचीत घटकांना समाज विकासाच्या प्रवाहामध्ये सहभागी करण्यासाठी प्रयत्न केले.

A संत गाडगे महाराज

प्रस्तावना -

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने अनेक व्यक्ती महात्म्ये, संत यांनी महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. या समाजसुधारकांमध्ये संत गाडगे महाराजांचे नाव प्राधान्याने घेतले जाते. कोणत्याही प्रकारची प्रसिध्दी नाही. गुरुशिष्यांची गर्दी नाही. कोणतीही संस्था स्थापन न करता केवळ आपल्या आचरणाने व 'किर्तनाच्या' माध्यमातून समाजसुधारणा करण्याचे कार्य गाडगेबाबांनी केलेले आहे. धर्म हा ग्रंथात नाही. तर तो मानवी जीवनात आहे. हा त्यांचा धर्माविषयी असणारा मानवतावादी दृष्टीकोन त्यांच्या विचारांची साक्ष देतो. सामान्य जनतेचे जीवन बदलण्यासाठी सामाजिक प्रबोधनाचे कार्य करणाऱ्या संत गाडगेबाबांचे जीवन आणि कार्य पुढीलप्रमाणे.

जीवनपरिचय -

संत गाडगेबाबांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील 'शेणगाव' याठिकाणी याठिकाणी 23 फेब्रुवारी 1876 मध्ये झाला. त्यांचे घराणे हे परीट समाजाचे होते. गाडगेबाबांचे मुळ नाव 'डेबुजी' असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव 'झिंगराजी जाणोरकर' असे होते. कुटुंबातील आर्थिक परिस्थिती चांगली होती. मात्र वडिलांच्या व्यसनामुळे जमिन, घर संपत्ती, सावकाराच्या ताब्यात गेली. वडिलांचे निधन झाल्याने डेबुजी यांची आई 'सखुबाई' यांना मोलमजुरी करावी लागत होती.

डेबुजी यांचे मामा चंद्रभावणाशी यांनी डेबुजी व त्यांची आई यांना आपल्या 'दापुरे' गावी आणले. मामांच्या घरी राहावे लागल्याने डेबुजी व त्यांची आई यांना शेती करण्याचे जनावरांना सांभाळण्याचे काम करावे लागले. अशा परिस्थितीमुळे डेबुजीच्या शिक्षण

Scanned with CamScanner

घेण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. शेतांवरती काम करताना जनावरांना सांभाळताना जाती-धर्माचा विचार न करता डेबुजी आपल्या मित्रांबरोबर राहू लागले. मामांच्या शेतीचा भारदेखील त्यांच्यावरती पडला. दिवसभर कामात व संध्याकाळी भजन करण्यात डेबुजी व्यस्त राहू लागले. डेबुजी यांचा विवाह 'कुंताबाई' यांच्याशी झाला. त्यांच्या मामांची सावकारी कर्जातून सुटका केली. कुटुंबातील सर्वजण प्रामाणिकपणे कष्ट करू लागल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारू लागली. डेबुजी यांना एकूण चार अपत्य झाली. मात्र या काळात डेबुजींचे मन संसारात रमण्याऐवजी लोकसेवेमध्ये रमु लागले. ते विरक्तीच्या मार्गाकडे झुकू लागले. मानवी जीवनातील दुःख अनिश्चितता याचा शोध घेण्याकडे ते आकर्षित झाले. '1 फेब्रुवारी 1905' मध्ये जगाचा संसार सुखी करण्यासाठी आपले कुटुंब सोडून बाहेर पडले.

संत गाडगेबाबांनी घरातून बाहेर पडल्यानंतर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यामध्ये प्रवेश केला. अंगावरती फाटक्या चिंध्यांचे कपडे अन्न व पाणी घेण्यासाठी हातात गाडगे, झोळी असा वेश त्यांनी परिधान केला. काम केल्याशिवाय कोठेही भाकरीला स्पर्श केला नाही. त्यांच्या विचित्र पोशाखामुळे त्यांना अनेक ठिकाणी त्रास सहन करावा लागला. समाजातील गरीब दीनदुबळ्यांचे त्यांनी निरीक्षण केले. व्यसनाच्या आहारी गेलेल्या कुटुंबाची दुर्दशा पाहिली. शेतकऱ्यांचे प्रश्न जातीयता कर्मकांड, अंधश्रद्धा, अज्ञान, निरक्षरता अशी समाजाची दयनीय अवस्था पाहिल्यानंतर संत गाडगेबाबांनी लोकसेवा आणि लोकशिक्षणाचे कार्य हाती घेतले. हे सेवाकार्य अखेरपर्यंत सुरू ठेवले. त्यांना अनेक नावाने ओळखले जाते. डेबुजीबुवा, वट्टीसाधु, चापरेबुवा, लोटके महाराज व संत गाडगे महाराज इत्यादी नावांनी त्यांना ओळखले जात होते. २० डिसेंबर 1956

मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांचे समाजसुधारणेतील योगदान पुढीलप्रमाणे.

1. लोकशिक्षणाचे कार्य.

संत गाडगेबाबांना लहानपणापासुनच भजनाची विशेष आवड होती. संत तुकारामांच्या अभंगाचा त्यांच्यावरती विशेष प्रभाव पडला होता. 12 वर्षे भटकंती केल्यानंतर त्यांनी सामाजिक सुधारणांसाठी 'किर्तन' या माध्यमाचा वापर सुरु केला. किर्तनाच्या माध्यमातून समाजसुधारणा व लोकशिक्षणाचे कार्य सुरु केले. आपल्या किर्तनातून त्यांनी काही उपदेश दिले ते पुढीलप्रमाणे.

* तहानलेल्यांना पाणी द्या.
* भुकेलेल्यांना जेवण द्या.
* जे विवस्त्र आहेत त्यांना वस्त्र द्या.
* गरीब मुला- मुलींना शिक्षणासाठी मदत करा.
* ज्यांना घर नाही अशांना आसरा द्या
* रोगी व्यक्तींवरती औषध- उपचार करा.
* बेकारांना रोजगार द्या
* निराश झालेल्या लोकांना आत्मविश्वास व हिंमत द्या
* पशु - पक्षी व मुक्या प्राण्यांना अभय द्या.

संत गाडगे महाराज निरक्षर असले तरी सामाजिक सुधारणेसाठी परिस्थितीनुसार आवश्यक असे अभंग पटकन सांगत. त्यांचे किर्तन म्हणजे लोकांशी सुसंवाद चालत असे लोकांना प्रश्न विचारुन त्यांचे अज्ञान, दोष, याची जाणिव करुन देत आपल्या किर्तनामध्ये प्रामाणिकता स्वच्छता, जातीभेद निर्मुलन यावरती भर देत असत. गाडगेबाबांनी स्वतःच्या 'खराटा संप्रदाय' निर्माण केला होता. या संप्रदायाच्या सहाय्याने केवळ गावच स्वच्छ केले नाही तर, लोकांची मनेदेखील स्वच्छ केली. एकजिनसी समाज

बनवण्यासाठी लोकसेवा व लोकशिक्षणाचे कार्य किर्तनाच्या माध्यमातून गाडगेबाबांनी केले.

2. धर्मविषयक कार्य -

संत तुकाराम महाराज संत कबीर यांचा गाडगेबाबांच्यावरती विशेष प्रभाव पडल्याने किर्तन हे परमेश्वर प्राप्तीचे साधन म्हणून न वापरता त्याला सामाजिक जागृतीचे साधन म्हणून वापरले. धर्माच्या नावाखाली सुरू असणाऱ्या अनिष्ट चालीरिती कर्मकांड, परंपरा, याला त्यांनी विरोध केला. त्यांनी कोणताही नवीन धार्मिक संप्रदाय गुरुपरंपरा निर्माण केली नाही. स्वत: इतरांचा गुरु होण्यास विरोध केला. ईश्वराचे अस्तित्व मान्य केले. मात्र नवस करणे, पुजा घालणे, पशुबळी देणे, या सर्व अंधश्रद्धा अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इतरांचा संसार व आपला संसार सुखी करणारा धर्म असावा. असा त्यांनी अद्येशी उपदेश केलेला आहे.

3. शिक्षणविषयक कार्य / दृष्टीकोन -

संत गाडगेबाबा स्वत: निरक्षर असले तरी ते तळमळीने लोकशिक्षणाचे काम करणारे शिक्षक व शिक्षणप्रसारक होते. किर्तनाच्या माध्यमातून त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य केले. लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी प्रवृत्त केले. अनेक ठिकाणी शाळा काढल्या अंधश्रद्धा निर्मुलन आरोग्याची जाणिव, लोककल्याणाची जाणिव व गरीबी कमी करण्यासाठी शिक्षण किती आवश्यक आहे हे लोकांना पटवून देत असत. कर्मवीर भाऊराव पाटील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे जनतेला देऊन सामान्य जनतेचा सर्वांगिण विकास हा गाडगेबाबांना शिक्षणातून अपेक्षित होता.

4. सामाजिक सुधारणा -

सामाजिक आणि आर्थिक विषमता याची निर्मिती जातीव्यवस्थेमुळेच झालेली आहे ही विषमता अमानवी स्वरूपाची आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी समता निर्माण केली पाहिजे. सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत. हे लोकांना त्यांनी पटवून दिले. किर्तनाच्या माध्यमातून व्यसनाच्या विरोधात जनजागृती केली. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. स्त्री विषमतेची चौकट मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. अधर्म, कर्मकांड यावरती टिका करून गोरगरीबांची सेवा, जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा असा उपदेश त्यांनी समाजाला दिला. मानवतावादी समतावादी समाज निर्माण करण्यासाठी जातीव्यवस्था मोडून टाकण्याचा प्रयत्न गाडगेबाबांनी केला.

5. समाज उपयोगी कामे -

संत गाडगे महाराज केवळ उपदेश करून थांबले नाहीत. तर आपल्या विचाराला आचारांची जोड दिली. त्यामुळे बाबांच्या कार्याला अनेक लोकांनी मदत केली. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सामान्य लोकांची राहण्याची व भोजनाची गैरसोय होत असल्याने त्यांनी ~~पं~~ पंढरपूर, आळंदी देहू, नाशिक याठिकाणी धर्मशाळा सुरू केल्या. अनेक ठिकाणी शाळा सुरू केल्या. लोकांच्या इच्छेसाठी लक्ष्मी - नारायणाचे मंदिर लोकवर्गणीमधून बांधले पुरणा नदीचा घाट, ऋणमोचंडा धर्मशाळा, जे-जे रुग्णालयाच्या परिसरात धर्मशाळा, पुणे येथे वृद्धाश्रम, त्यांनी स्थापन केला. या सर्वांचा त्यांनी एक ट्रस्ट स्थापन केला. मात्र या ट्रस्टवर आपल्या कुटुंबातील कोणाचाही अधिकार राहणार नाही. हे त्यांनी स्पष्ट केले. अध्यात्माच्या मार्गामध्ये अधिक न जाता साधे राहणीमान, भूतदया मानवता, स्वच्छता

Scanned with CamScanner

समानता याची शिकवण त्यांनी समाजाला दिली.


सारांश -

वरीलप्रमाणे सामाजिक सुधारणेचे कार्य संत गाडगेबाबांनी अविरतपणे चालु ठेवले. आपल्या आचार व विचाराने सामान्य लोकांच्या मनामध्ये सामाजिक सुधारणेची ज्योत प्रज्वलित केली. संत तुकाराम हे माझे गुरु आहे. पण माझा कोणी शिष्य नाही. ही शिकवण त्यांनी लोकांना दिली. आचार्य अत्रे यांनी 'खराट्याचा बादशहा' तर आंबेडकरांनी गरीबांचा 'कैवारी' म्हणून गाडगेबाबांना पदवी दिली. किर्तनाच्या माध्यमातून लोकजागृतीवर भर देऊन समाजसेवेचे कार्य स्विकारुन सामाजिक सुधारणा करण्याचे भरीव कार्य संत गाडगे महाराज यांनी केलेले आहे.

Scanned with CamScanner

## (ड) अण्णाभाऊ साठे

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेल्या प्रबोधन पर्वाने २० व्या शतकाच्या पूर्वार्धात अधिकच गती घेतली. या प्रबोधन परंपरेत काहींनी सनदशीर मार्गाने तर काहींनी क्रांतिकारी मार्गांनी बदल घडवून आणला. समकालीन काळाचा विचार करता समाजात अनेक चालीरीती, परंपरांचे मोठे प्रस्थ होते. शिक्षण समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचलेले नव्हते. विशिष्ट समाजापुरतीच शिक्षणाची कवाडे खुली होती. अनिष्ट प्रथा, शिक्षणाचा अभाव, त्यातून येणारी आर्थिक विपन्नावस्था, सामाजिक मागासलेपण, राजकीय स्वातंत्र्याचा अभाव आणि परकीयांची गुलामगिरी अशी साधारण तत्कालीन परिस्थिती होती. या भयाण अंधकारातून समाजाला प्रकाशवाटेवर आणण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारक, राजकारणी, विचारवंत, तत्त्ववेत्ते, साहित्यिक आदींनी तन-मन-धन अर्पण करून भरीव कार्य केले. यापैकी काही जणांना शिक्षणाचा, काहींना धर्माचा तर काहींना आपल्या समाजाचा वारसा कामी आला. मात्र ज्या व्यक्तीला ना शिक्षणाचा, ना धर्माचा, ना त्याच्या घराण्याचा कसलाही वारसा लाभला तरीदेखील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ज्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सारस्वतांच्या मांदियाळीत सर्वांना विचारप्रवण बनवले अशी व्यक्ती म्हणजे कर्ते समाजसुधारक, लोककवी, शाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे होय. अशा या थोर समाजसुधारकाचा जीवनप्रवास, त्यांनी केलेले विपुल लेखन व त्यांचे कार्य यावर आपण प्रकाश टाकणार आहोत.



**अण्णाभाऊ साठे**

### जीवन परिचय

'फकिरा'कार म्हणून सर्वपरिचित असलेले अण्णा भाऊ साठे यांचे मूळचे नाव 'तुकाराम'. अण्णाभाऊ साठे या टोपण नावनेच ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म

Scanned with CamScanner

१ ऑगस्ट, १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. भाऊराव हे वडिलांचे तर वालुबाई हे त्यांच्या आईचे नाव. जातीयतेच्या फेऱ्यात अडकलेल्या समाजाच्या निर्बंधांमुळे गावकुसाबाहेरचं जीणं त्यांच्या वाटेला आले. घरात अठराविश्व दारिद्र्य, नित्य नियमाची झालेली उपासमार, इथल्या समाज व धर्मव्यवस्थेमुळे वाट्याला येणारे भयाण दुःख अशा परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. आपल्या मुलाने खूप शिकावे असा आई वालुबाई यांचा आग्रह होता. मात्र शिक्षणाबद्दलची अनास्था आणि सामाजिक परिस्थितीच्या परिणामस्वरूप अण्णाभाऊंची दीड दिवसांची शाळा झाली. भूक, बेकारी यांबरोबर नित्याचा संघर्ष करत असतानाच १९३२ मध्ये अण्णाभाऊ आपल्या वडिलांसोबत आपले नशीब आजमावण्यासाठी वाटेगाव ते मुंबई पायी प्रवास करत मुंबईत दाखल झाले. पोटाची आग विझवण्यासाठी हमाली, गिरणीमध्ये काम, खाणीमध्ये काम, कोळसा वाहणे अशी मिळतील ती कामे करू लागले. लहानपणापासूनच त्यांना गायन व वादनाची आवड होती. तर मधुर आवाजाची त्यांना नैसर्गिक देणगीच लाभली होती. मुंबईच्या वास्तव्यातच ते कामगार चळवळ व संयुक्त महाराष्ट्र लढा याकडे आकृष्ट झाले. जन्मजात लाभलेल्या प्रतिभेच्या आधारे अक्षरओळख नसतानाही हातातील लेखणी व डफाच्या आधारे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. १९३७ च्या दरम्यान कोंडाबाई यांच्यासमवेत त्यांचा पहिला विवाह झाला. १९४४ साली स्थापन केलेल्या कलापथकाच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी लेखक, गायक, कार्यकर्ता, नेता अशा विविध भूमिका साकारल्या. मध्यंतरीच्या काळात डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स, लेनिन, मॅक्झिम गॉर्की, टॉलस्टॉय इत्यादी विचारवंतांच्या साहित्याचे स्वैरपणे वाचन व चिंतन केले. डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा अण्णाभाऊंवरती विशेष प्रभाव होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून सर्वत्र रान पेटवले. १९६१ मध्ये त्यांना रशियाला जाण्याचे भाग्य लाभले. साहित्यामध्ये एकएक मैलाचा दगड निर्माण करणाऱ्या या साहित्यिकास आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र वैफल्यग्रस्त जीवन वाट्यास आले. अशाच परिस्थितीत १८ जुलै, १९६९ रोजी अण्णाभाऊंचे अत्यंत दुर्दैवी निधन झाले.

### साहित्य संपदा

शिक्षणाची नि साहित्याची कोणतीही पार्श्वभूमी नसताना अण्णाभाऊंनी निर्माण केलेले साहित्य आपणास थक्क करते. प्रतिभेचा आणि शिक्षणाचा, विद्वत्तेचा आणि शिक्षणाचा काहीएक संबंध असतो हे तत्त्व अण्णाभाऊंनी खोडून काढले. पूर्वापार चालत आलेल्या, रुळलेल्या वाटेने न जाता अण्णाभाऊंनी स्वतःच्या साहित्याची

Scanned with CamScanner

एक वेगळीच वाट, एक राजमार्ग निर्माण केला. साहित्य व कला या क्षेत्रातील असा एकही प्रकार नसेल की ज्यावरती अण्णाभाऊंनी लेखन केले नाही. आपल्या कथा, कादंबऱ्या, लोकनाट्य, प्रवासवर्णन इत्यादी साहित्यांतून त्यांनी ग्रामीण समाजाची, कष्टकऱ्यांची, कामगारांची व स्त्रियांची वास्तववादी, सत्य स्थिती समाजासमोर मांडून सर्वांना अंतर्मुख केले. सर्वांना विचार करायला भाग पाडले. अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केलेली साहित्यकृती खालीलप्रमाणे –

**(अ) कथासंग्रह**

१. बरबाद्या कंजारी
२. चिरागनगरची भूतं
३. निखारा
४. नवती
५. पिसाळलेला माणूस
६. आबी
७. फरारी
८. भानामती
९. लाडी
१०. कृष्णाकाठच्या कथा
११. खुळंवाडी
१२. गजाआड
१३. गुऱ्हाळ

**(ब) कादंबऱ्या**

१. अग्निदिव्य
२. अलगूज
३. अहंकार
४. आग
५. आघात
६. आवडी
७. कुरूप
८. केवड्याचं कणीस
९. गुलाम
१०. चंदन
११. चिखलातील कमळ
१२. चित्रा
१३. जिवंत काडतूस
१४. ठासलेल्या बंदुका
१५. डोळे मोडीत राधा चाले
१६. तास
१७. धुंद रानफुलाचा
१८. पाझर
१९. फकिरा
२०. फुलपाखरू
२१. मंगला
२२. माकडीचा माळ
२३. मथुरा
२४. मास्तर
२५. मूर्ती
२६. रत्ना
२७. रानगंगा
२८. रानबोका
२९. रूपा
३०. वारणेचा वाघ
३१. वारणेच्या खोऱ्यात
३२. वैजयंता
३३. वैर
३४. संघर्ष
३५. सैरसोबत

Scanned with CamScanner

(क) **लोकनाट्य**

१. अकलेची गोष्ट
२. खापऱ्या चोर
३. शेठजीचं इलेक्शन
४. देशभक्त घोटाळे
५. निवडणुकीत घोटाळे
६. बेकायदेशीर
७. माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची?
८. मूक मिरवणूक
९. नवे तमाशे
१०. पुढारी मिळाला
११. लोकमंत्र्यांचा दौरा
१२. इनामदार (नाटक)
१३. बिलंदर बुडवे
१४. दुष्काळात तेरावा
१५. पेंग्याचं लगीन (नाटक)
१६. सुलतान (नाटक)

(ड) **पोवाडे**

१. नानकीन नगरापुढे
२. स्टॅलिनग्राडचा पोवाडा
२. बर्लिनचा पोवाडा
४. बंगालची हाक
५. पंजाब-दिल्लीचा दंगा
६. तेलंगणचा संग्राम
७. महाराष्ट्राची परंपरा
८. अमळनेरचे अमर हुतात्मे
९. मुंबईचा कामगार
१०. काळ्या बाजाराचा पोवाडा

(इ) **अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीवर आधारित चित्रपट**

| **कादंबरी** | | **आधारित चित्रपट** |
|---|---|---|
| १. वैजयंता | - | वैजयंता |
| २. आवडी | - | टिळा लावते मी रक्ताचा |
| ३. माकडीचा माळ | - | डोंगरची मैना |
| ४. चिखलातील कमळ | - | मुरली मल्हारी रायाची |
| ५. वारणेचा वाघ | - | वारणेचा वाघ |
| ६. अलगूज | - | अशी ही साताऱ्याची तऱ्हा |
| ७. फकिरा | - | फकिरा |

(ई) **शाहिरी वाङ्मय**

१. शाहीर
२. माझी मैना
३. प्रवास वर्णन - माझा रशियाचा प्रवास

**साहित्यातील आशय**

विद्वत्ता, गुणवत्ता नि प्रतिभा यावर असलेल्या अभिजन वर्गाच्या एकाधिकारशाहीला छेद देत अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण केले. औपचारिक

Scanned with CamScanner

शिक्षणाची कास न धरता अण्णाभाऊंनी आयुष्यभर समाजरूपी शाळेत आलेल्या विविध अनुभवांचे पाठ गिरविले. बालपणापासून त्यांना जे जगणं वाट्याला आलं, तशाच प्रकारचे जीवन जगणाऱ्या बहुसंख्याक बहुजन वर्गातील लोकांच्या मनातील प्रातिनिधिक विचार त्यांनी साहित्यातून शब्दबद्ध केले. मनोहारी चित्रण, कल्पनारंजन, भोगवाद व विकृती याला फाटा देऊन त्यांनी आपल्या साहित्याची नाळ सर्वसामान्य रंजल्या-गांजलेल्या जनतेशी जोडली. या संदर्भात 'जो कलावंत जनतेची कदर करतो, जनता त्याचीच कदर करते' यावर त्यांचा मनोमन विश्वास होता. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्याच जातिकोषात न गुरफटता जो जो वर्ग अन्याय अत्याचारग्रस्त होता त्यांचे मूर्तिमंत चित्रण आपल्या साहित्यकृतीतून समाजासमोर मांडले. त्यामुळेच त्यांचे साहित्य सर्व भारतीय भाषांत प्रकाशित तर झालेच, शिवाय फ्रेंच, रशिया आदी सत्तावीस देशांत भाषांतरित झाले. असे उत्तुंग यश मिळवणारा हा आगळावेगळा अवलिया होता.

अण्णाभाऊ साठे यांचे लेखन विविधांगी आहे. 'आवडी' या कादंबरीत उच्चवर्णीय आवडी चौगुले आणि मागासवर्गीय धनाजी रामोशी यांच्या आंतरजातीय प्रेमविवाहाची कथा रेखाटून त्याद्वारे जातिअंताचा संदेश दिला आहे. पोटाची आग शमविण्यासाठी माणूस कोणत्या भयावह थराला जातो याचे वर्णन 'स्मशानातील सोनं' कथेत आलेले आहे. या कथेद्वारे भारतीय समाजव्यवस्थेतील श्रमजीवी वर्गातील लोकांची विदारक स्थिती रेखाटून भारतातील जातीय व वर्गीय लढ्यावर भाष्य केले आहे. 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहात सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या लोकांची दुःखे, अंधश्रद्धा, अगतिकता नि व्यसनाधीनता याचे चित्रण रेखाटले आहे. त्याद्वारे श्रमजीवी, कष्टकरी विरुद्ध अभिजन वर्ग असा वर्गलढा अण्णाभाऊंनी रेखाटला आहे. 'खुळंवाडी' या कथानकात मंजुळेच्या अब्रूला केसभर धक्का लागताच पाटलाचा हात तोडणारा सखुबा खुबा, बंडवाला तात्या मांग, यदू रामोशी, लखू माने यांसारख्या अन्याय व अत्याचाराला प्रत्युत्तर देणाऱ्या जिगरबाज व्यक्तिरेखा चितारलेल्या आहेत. वारणा, कृष्णा नदीखोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या परिसरातील माणसांचे प्रतिनिधी बर्डे गुरुजींवर 'मास्तर' कादंबरी आधारित आहे. 'धुंद रानफुलांचा' या कादंबरीत स्वातंत्र्यलढ्याचे वर्णन करताना म्हणतात,

'बंदूक ठासून उठे शेतकरी तेली तांबोळी ।
गुलामगिरीची होळी पेटवून मारी गोळी ।।'

'आबी' कथासंग्रहातील सुंदर, बांधेसूद नायिका स्वतःच्या शीलरक्षणार्थ

Scanned with CamScanner

खलनायकाच्या डोक्यात पायरी घालून त्यास ठार मारते तर 'डोळं' या कथेत सुंदर डोळे, सौंदर्याने होणाऱ्या घातापायी, बापाला कलंक लागू नये, घराण्याची इज्जत, अब्रू जाऊ नये म्हणून स्वतःचे डोळे फोडून घेते असे कथानक आले आहे. गरिबांचा तारणहार व श्रीमंतांचा कर्दनकाळ ठरलेला सत्तू परिस्थितीमुळे कसा दरोडेखोर बनतो याचे चित्रण 'वारणेचा वाघ' या कादंबरीचा विषय आहे. 'अलगूज' व 'वैजयंता' या सुंदर प्रेमकथेवर आधारलेल्या कादंबऱ्या आहेत. 'चिरागनगराची भूतं' या कादंबरीतून मुंबईच्या झोपडपट्टीतील भयावह वास्तव, बकालपण चित्रित केले आहे. 'माकडीचा माळ'मध्ये भटक्या लोकांचे जीवन तर 'चंदन'मध्ये स्त्रिया व भटक्यांच्या व्यथा मांडलेल्या आहेत तर 'चित्रा' कादंबरीतून कामगार लढ्यावर प्रकाश टाकलेला आहे.

तमाशासाठी अण्णाभाऊ साठे यांनी 'लोकनाट्य' हा शब्द प्रथम त्यांनीच वापरला. देशभक्तीचा पोकळ आव आणून आपलाच टेंभा मिरवणाऱ्या एका देशभक्ताच्या घोटाळ्यावर आधारित 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यातून भ्रष्टाचारविरोधात लोकांच्या मनाची मशागत केली. लोकनाट्यात पारंपरिकतेला भेदून तमाशाची सुरुवात गणेशस्तवनाने करण्याऐवजी 'प्रथम मायभूच्या चरणा । छत्रपती शिवबा चरणा, स्मरोनी गातो कवना' अशी प्रथा सुरू केली. गणानंतरच्या गवळणीतही कृष्णलीलेऐवजी शेतकरी, कामगार अशी पात्रे त्यांनी नव्याने उभारली.

समाजातील सर्व वर्गांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी एकीच्या भावनेने विद्रोहात सामील होणे का महत्त्वाचे आहे हे त्यांनी आपल्या 'शिवारी चला' या पोवाड्यात विशद केले आहे. भारतीय समाजातील जात व वर्ग जाणिवांचे पडसाद त्यांच्या साहित्यात उमटतात. 'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाड्यात महात्मा फुले यांच्याबद्दल लिहिताना ते म्हणतात,

'महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला ।
अन्याय निवारूनी न्याय द्याया दलिताला ।।'

भारतातील जातिव्यवस्था व धर्मांधता यामुळे बहुजनांच्या, दलितांच्या वाट्याला आलेल्या हालअपेष्टांचा निषेध करून यात बदलाची ते अपेक्षा करताना म्हणतात, 'जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।' भारतातील वर्गीय व्यवस्था, गुलामगिरी, सामाजिक भेदभाव याच्या निवारणार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे घाव घालून सामाजिक बदलासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कार्याची महती सांगताना ते म्हणतात,

Scanned with CamScanner

'धनवंतांनी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले।
मगराने जणू माणिक गिळले । चोर जाहले साव।।
ठरवून आम्हा हीन कलंकित । जन्मोज़न्मी करून अंकित ।
जिणे लादूनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ।
जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।।'

## राजकीय कार्य

सन १९३६ पासूनच ते कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचाराने प्रभावित झाले होते. यातूनच त्यांनी कम्युनिस्ट पार्टीत प्रवेश केला. डफ व गायनाच्या साहाय्याने शाहिरीच्या माध्यमातून काही काळ पार्टीच्या प्रचाराची धुरा सांभाळली. १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांनी गोवा मुक्ती संग्रामातही सहभाग घेतला. शाहिरी वाङ्मयाच्या माध्यमातून समाजात जाणीवजागृती करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला. १९४२ च्या आंदोलनात बर्डे गुरुजींसोबत त्यांनीही सहभाग नोंदवला. मात्र ब्रिटिश सरकारने अटक वॉरंट काढल्याने पुन्हा मुंबईला प्रयाण केले. सन १९४४ मध्ये शाहीर अमर शेख व शाहीर गव्हाणकर यांच्या साहाय्याने 'लाल बावटा कलापथक' स्थापन केले. या कलापथकाच्या माध्यमातून, पोवाड्यातून अण्णाभाऊंच्या कविमनाने अन्यायाविरुद्ध प्रखर प्रतिक्रिया नोंदवल्या. १९४० च्या दशकात कार्यरत असताना अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले. फाळणीच्या पार्श्वभूमीवर दिल्ली, पंजाब येथे उसळलेल्या जातीय दंग्यांवर पोवाड्यातून मतप्रदर्शन करताना म्हणतात,

माणूसकी पळाली पार । होऊनी बेजार । पंजाबातून ।।
सूडाची नशा चढून । लोक पशूहून । बनले हैवान ।।

दोन धर्मांतील लोकांमध्ये झालेल्या हत्यांमुळे खिन्न झालेले अण्णाभाऊ सर्वांना कळकळीची विनवणी करताना म्हणतात.

द्या फेकून जातीयतेला । करा बंद रक्तपाताला ।
आवरोनी हात आपुला ।
भारतीयांना इभ्रत तुमची इर्षेला पडली ।
काढा बाहेर नौका वादळात शिरली।।
धरा सावरून एकजुटीने दुभंगली दिल्ली ।
काढा बाहेर राष्ट्रनौका ही वादळात गेली।।

सन १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वाणानिमित्त 'जग बदल घालून घाव। सांगून गेले मज भीमराव ।।' या गीताद्वारे त्यांच्याप्रति निष्ठा व्यक्त केली. १९५७ पासून संयुक्त महाराष्ट्र लढ्याने वेगवेगळी वळणे घेतली तेव्हा त्याला अधिक



Scanned with CamScanner

उग्र रूप देण्यासाठी अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकरांनी जीवाचे रान केले. या सर्वांनी भूमिगत राहूनही हा लढा कसा तेवत राहील याची काळजी घेतली. साम्यवादी उपासक अण्णाभाऊ साठे यांनी कामगार, कष्टकरी, दलित, पीडित, शोषित यांच्या उद्धाराबरोबरच आपले जाज्वल्य राष्ट्रप्रेम तेवत ठेवले. हे त्यांच्या 'उठला मराठी देश', 'महाराष्ट्रावरून टाक ओवाळून काया' यांसारख्या आदी साहित्यातून होते. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होत असताना काही भाग आपल्यापासून वेगळा होणार, कदाचित मुंबईलाही आपल्याला मुकावे लागणार या नुसत्या विवंचनेने व्याकूळ झालेल्या कविमनाच्या अण्णांमार्फत एका अप्रतिम लावणीचा जन्म झाला. 'माझी मैना गावावर राहिली । माझ्या जीवाची होतेय काहिली।।' या लावणीतील मुंबईतील गिरणी कामगार आणि गावाकडे राहिलेली त्याची पत्नी यांच्यातील विरह म्हणजे प्रत्यक्षात मुंबईला, सीमाभागाला दुरावणारा प्रत्येक महाराष्ट्रीयन होता. अण्णाभाऊंना मुंबई जशी प्रत्यक्षात दिसली तशीच ती त्यांनी आपल्या मुंबईची लावणी यात नोंदवली. ते म्हणतात,

मुंबईत उंचावरी। मलबार हिल इंद्रपूरी। कुबेरांची वस्ती तेथे सुख भोगती।।
परळात राहणारे। रात्रंदिवस राबणारे। मिळेल ते खाऊनी घाम गाळती।।

सन १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची सर्व सत्तासूत्रे उच्चभ्रूंच्या हाती एकवटली. हे त्यांना मान्य नव्हते. म्हणून त्यांनी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला. त्या मोर्चातील घोषणा होती, 'ये आझादी झूठी है, देश की जनता भूखी है।' भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा असलेल्या इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनमध्येही ते महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते.

### पुरस्कार

अण्णाभाऊंनी अनेक कथा, कादंबऱ्यांची रचना केली तरी ते 'लोकशाहीर' म्हणूनच सर्वांना परिचित आहेत. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीला १९६१ साली उत्कृष्ट कादंबरी म्हणून महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त झाला. 'वैजयंता' या चित्रपटास १९६१-६२ साली उत्कृष्ट मराठी चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. तर 'वारणेचा वाघ' या चित्रपटास महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट चित्रपटाचा द्वितीय तर 'अशी साताऱ्याची तऱ्हा' या चित्रपटास तृतीय पारितोषिक प्राप्त झाले होते.

अशा रीतीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अण्णाभाऊंनी साहित्याच्या क्षेत्रात अनेकानेक कलाकृती निर्माण केल्या. त्याद्वारे कष्टकरी, कामगार, दलितांच्या

Scanned with CamScanner

व्यथा, त्यांचे भावविश्व, शेतकरी, मजूर, हमाल, वेश्या, दरोडेखोर या व्यक्तिरेखांची पराकाष्ठा व लढाऊ बाणा चित्रित केला. अशा या साहित्यसम्राटाला मात्र साहित्यविश्वात उपेक्षेचंच जीणं वाट्याला आलं. काही सन्माननीय अपवाद वगळता त्यांच्या साहित्याची तत्कालीन समाजाने फारशी दखल घेतली नाही. तरीसुद्धा २ मार्च, १९५८ रोजी महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या साहित्य संमेलनामध्ये उद्घाटनपर भाषणात व्यक्त होताना, 'हे जग, ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे' असा वास्तववादी मंत्र देणाऱ्या अण्णाभाऊंना जनतेने 'लोकशाहीर' ही उपाधी दिली. त्यांनी आपल्या साहित्यात देव, धर्म, कल्पनारंजन नाकारून भौतिकवादी, विज्ञानवादी व परिवर्तनवादी विचारांची मांडणी केली. त्यांच्या साहित्याचे मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी, पंजाबी, कन्नड आदी भारतीय भाषांबरोबर फ्रेंच, रशियन, पोलिश आदी भाषांत भाषांतरे झाली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या रशियन विद्यापीठात अभ्यासक्रमात शिकवल्या गेल्या. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्व दुःखितांच्या हृदयाला स्पर्श करणारे होते. त्यामुळेच त्यांचे पुतळे भारत देशाशिवाय ब्राझील व रशियासारख्या देशांत उभे राहिले. भारतीय समाजातील वर्गीय विषमतेच्या अंताची प्रेरणा घेऊन, साहित्याच्या माध्यमातून संघर्षासाठी प्रेरणादायी ठरणारे, मानवमुक्तीचे उद्गाते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना 'साहित्यरत्न' ही उपाधी सार्थ ठरते.